बीड । रविवार
२९.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ८९
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# करोडोच्या संख्येने मराठा अंतरवालीत धडकणार




## अंतरवाली सराटीत आज महा बैठकीचे आयोजन

## अंतिम निर्णायक बैठक; हातातील कामे सोडून या

### मनोज जरांगे पाटील यांचे मराठा समाजाला भावनिक आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील गोर-गरीब मराठा समाजातील लेकरांच्या हितासाठी, भविष्यासाठी ही शेवटची अंतरवाली सराटीतील बैठक होणार आहे. अंतिम निर्णायक बैठक होईल. आज दिशा ठरवली जाणार आहे. २९ ऑगस्ट रोजी मुंबईत जायचे आहे, मराठा समाजाच्या मागण्या, आतापर्यंत काय मिळाले आणि आता आपल्याला काय मिळवायचे आहे, याबाबत चर्चा होणार आहे. त्यामुळे उद्या दुपारी १२ वाजता या, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. सोमवारपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांनी बोलावलेली महाबैठक महत्त्वाची मानली जात आहे.

अंतरवाली सराटीत आज मराठा समाजाची महाबैठक पार पडणार आहे. या बैठकीसाठी मराठा ▶▶ उर्वरित पान २ वर

**● खासदार सोनवणे व आमदार क्षीरसागर यांचे टोल माफीसाठी पत्र**

**राज्यभरातून मराठा बांधव अंतरवाली सराटी येथे महा बैठकीसाठी आज दुपारी बारा वाजता उपस्थित राहणार आहे. यासाठी बीडचे खासदार बजरंग सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी राज्यभरातून येणाऱ्या मराठा बांधवांच्या चार चकी वाहनांना टोल माफी मिळावी यासाठी आय आर बी व संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीच्या महाप्रबंधकांना पत्र दिले आहे. सोमवारपासून पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे या पार्श्वभूमीवर अंतरवली सराटीत मराठा आरक्षण संदर्भात अंतिम निर्णय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत राज्यभरातून लाखोंच्या संख्येने मराठा समाज उपस्थित राहणार असल्याचे बोलले जात आहे.**

# विजय पवार आ. संदीप क्षीरसागर याचा राईट हॅन्ड घटनेनंतर आमदाराच्या घरुन यंत्रणेला फोन

### डॉक्टर योगेश क्षीरसागर यांचा गंभीर आरोप ; सखोल चौकशी करून पीडीतेला न्याय द्या

### राजकारण बाजूला सारून सोमवारी होणाऱ्या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन



**● राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन**

**पोलीस अधीक्षकांकडून तसेच पीडितेच्या कुटुंबियांकडून माहिती घेतली असून, संपूर्ण प्रकरण पालकमंत्र्यांसमोर मांडले जाणार आहे. पवारचे सीडीआर तपासणे, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेणे आणि आरोपीवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे डॉ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. राजकारण बाजूला ठेवून आरोपीला वाचवण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडवून देणाऱ्या अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळ प्रकरणी राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात मातब्बर असणाऱ्या प्राध्यापक विजय पवार व प्रशांत खटावकर यांच्यावर गुन्हा नोंद झाला असून याप्रकरणी दोन्ही आरोपी फरार झाले आहत. विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांच्या अत्यंत जवळचा असून त्यांचा राईट हॅन्ड म्हणून बीड शहरात वावरतो. यासह घटने नंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन यंत्रणेला फोन केल्या असल्याचा आरोप डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी केला असून बीड येथे ला न्याय देण्यासाठी सोमवारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# खाजगी क्लासेस बंद नको तर प्रशासनाने नियंत्रणासाठी कडक रणनीती हाती घ्यावी

### खाजगी कोचिंग क्लासेस मधील कोट्यावधीच्या उलाढाली कडे आयकर विभागाचे लक्ष आहे का ?

**बीड । प्रतिनिधी**



परवा बीड मधील खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये अल्पवयीन विद्यार्थिनी बरोबर घडलेला किळसवाना प्रकार निंदनीय असून पुन्हा एकदा बीड जिल्ह्याची इभ्रत चव्हाट्यावर आली. शैक्षणिक क्षेत्रात काळीमा फासणारी ही घटना चिंतनीय आहे. दोषी नराधम ला तातडीने अटक करून कडक कारवाई करावी. अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार हे अक्षम्य आहेत. या घटनेमुळे मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न गंभीर झाला आहे. तर खाजगी कोचिंग क्लासेसचा बाजार चव्हाट्यावर आला आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा व इतर खाजगी शाळांचा शैक्षणिक दर्जा लक्षात घेता खाजगी कोचिंग क्लासेस बंद करणे म्हणजे विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडणे होय. शाळा महाविद्यालयांनी प्रामाणिकपणे दर्जा टिकवला असता तर कोचिंग क्लासेसचा बाजार भरला नसता. स्पर्धेच्या युगात मुख्य प्रवाहात राहण्यासाठी कोचिंग क्लासेसचा पर्याय पालकांना आधार वाटतो. परंतु या कोचिंग क्लासिकच्या बाजारावर प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून अवाजवी फीस ओरडण्याचे काम केले जाते. इमारतीची क्षमता आणि विद्यार्थ्यांची संख्या याचे संतुलन राखले जात नाही. विद्यार्थ्यांना वाहन पार्किंगची व्यवस्था नाही. खाजगी कोचिंग क्लासेला कोणत्या यंत्रणे कडून परवानगी दिली जाते. फीसचे धोरण कोण ठरवते. याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. खाजगी कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा व्यवहार घडतो. यावर आयकर विभागाची नजर अद्याप का गेली नाही. असे अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण ▶▶ उर्वरित पान २ वर

# दीड वर्षापासून रोजगार सेवक नसल्याने कानडी खुर्द (मेहकरी) येथील ग्रामस्थांची कामे रखडली

**● जुन्या दोनच अर्जाची दखल घेऊन नवीन रोजगार सेवक नियुक्त करावा, गटविकास अधिकारी यांना ग्राम स्थांची मागणी**

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कानडी खुर्द (मेहकरी) गावात रोजगार हमी योजनेअंतर्गत मनरेगा कामासाठी नियुक्त केलेला रोजगार सेवकाचे दीड वर्षांपूर्वी निधन झाले असल्यामुळे ग्रामस्थांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळणे, नवीन कामाचे अर्ज करणे आणि योजनेचा लाभ घेणे अशक्य झाले आहे. अनेक गरीब कुटुंबांना यामुळे आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. नवीन रोजगार सेवक नियुक्त करण्यासाठी ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. आष्टी तालुक्यातील कानडी खुर्द

▶▶ उर्वरित पान २ वर

# जगाला हिरव्या मशालींची गरज- सिने अभिनेते सयाजी शिंदे

### श्री क्षेत्र रामगडावर १० एकर मध्ये फुलणार सह्याद्री देवाराई, सयाजी शिंदे यांच्या हस्ते ७५ झाडे लावून वृक्ष लागवडीला सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

जगाला आपल्याकडून काही देता आलं तर ते वृक्ष लागवडीतून देता येईल. सध्या जगाला हिरव्या मशालींची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकानी आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वाढदिवसा येवढे झाडे



लावली पाहिजेत. असे आवाहन सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले. बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड येथे १० एकर मध्ये फुलणाऱ्या सह्याद्री देवराई प्रकल्पाची सुरूवात त्यांच्या हस्ते ७५ झाडे लावून करण्यात आली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# विजय पवार व प्रशांत खाटोकर यांना तात्काळ अटक करा : अशोक लोढा



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील खाजगी क्लासेसचे संचालक विजय पवार व प्रशांत खाटोकर यांनी शैक्षणिक क्षेत्राला काळीमा फासण्याचे काम केले असून अत्यंत घृणास्पद गुन्हा केलेला आहे. बालमनाचा विचार न करता त्यांचे भविष्य उध्वस्थेकडे नेऊ पाहणाऱ्या या वासनांध प्रवृत्तीच्या नराधमाना तात्काळ अटक करावी. तसेच या आरोपींची कॉल रेकॉर्डिंग आणि मोबाईल डाटा व त्यांना सहकार्य करणाऱ्यांचे मोबाईल जप्त करून तपासण्या करण्यात याव्यात. तसेच त्यांना मदत करनाऱ्याना सह आरोपी करण्यात यावे असे निवेदन पोलिस अधीक्षक, बीड यांना भाजपा बीड शहर च्या वतीने देन्यात आले. खाजगी शिकवणी घेणाऱ्या संस्थांना शिकवणी बाहेरील परिसर व आतील सर्व वर्ग ऑफिस जिने आदींचे कोणताही परिसरात यातून राहणार नाही याची काळजी घेत चित्रण करनारे उच्च प्रतीचे कॅमेरे बसवणे बंधनकारक करावे याचे नियंत्रण पोलिस कंट्रोल

▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्ह्यातील गुटखा माफीयांचे पोलिसांनी कंबर मोडले

### वेगवेगळ्या कारवाई २४ लाख रुपयांचा मुद्देमाल केला जप्त ! पोलीस अधीक्षक क्शन मोडवर

**● अधिकारी, कर्मचाऱ्यांचे केले कौतुक**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील काळात अवैध गुटख्याची वाहतूक, साठा व विक्री करणाऱ्या इसमांविरुद्ध जोरदार कारवाया सुरु आहे. त्याचाच भाग म्हणुन दिनांक २७/०६/२०२५ रोजी माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांना गोपनीय माहीती मिळाली की, संजय शिवाजीराव होके (वय ३४, रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी सपोनि प्रल्हाद मुंडे, पोअं/१६१९ अंगद घोडके यांचेसह माजलगाव शहरातील जुना मोंढा भागातील न्यू तुळजाभवानी ट्रेडर्स या किराणा दुकानावर छापा टाकला असता संजय शिवाजीराव होके (वय ३४, रा. पाटील गल्ली, माजलगाव) हा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा बेकायदेशीरपणे विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून विविध कंपनीचा एकूण ३७,४६२/- रुपये किमतीचा गुटखा व १५,०००/- रुपये किमतीचा सॅमसंग मोबाईल असा एकूण ५२,४६२/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच गुटखा आणून देणारा जुबेर सिद्दिकी (रा. माजलगाव) याचाही तपास करण्यात येत आहे. या दोघांविरुद्ध महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची बेकायदेशीर विक्री केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर दुसऱ्या





▶▶ उर्वरित पान २ वर



# देशाचे भविष्य अंमली पदार्थांच्या दलदलीत अडकू नये

व्यसन फक्त नाश करते; व्यसनी व्यक्ती ज्या अंमली पदार्थाचे सेवन मोठ्या उत्कटतेने करते ते शरीरावर व मनावर अतिशय घातक परिणाम करते. व्यसन हे सर्वप्रथम व्यक्तीच्या मेंदूवर वर्चस्व गाजवते आणि त्याची विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता नष्ट करते आणि हळूहळू संपूर्ण शरीर कमकुवत करते. जोपर्यंत व्यसनाचा परिणाम मेंदूवर राहतो तोपर्यंत व्यसनाधीन व्यक्तीच्या अनुचित वर्तनाची शक्यता प्रबळ राहते. ही एक साधी गोष्ट आहे, जर एखाद्या व्यक्तीचा मेंदू अनियंत्रित असेल तर त्याचे स्वतःवर नियंत्रण राहणार नाही. २०२१ च्या जागतिक औषध अहवालानुसार, अंमली पदार्थांचा वापर आणि गुन्हेगारी यांच्यात जवळचा संबंध आहे. आपण स्वतः पाहतो की जगभरातील गुन्हेगारीमध्ये वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे अंमली पदार्थांचे व्यसन, म्हणजेच, अर्ध्याहून अधिक गुन्हे हे अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली किंवा अंमली पदार्थांसाठी केले जातात. व्यसनासाठी पैसे न मिळाल्याने व्यसनी स्वतः च्या पालकांना देखील मारतात अशा बातम्या किंवा वाईट कृत्य आपण अनेकदा ऐकतो आणि पाहतो. आजकाल, गुन्हेगारी अगदी लहान वयातच दिसून येते, अगदी शाळकरी मुले देखील ड्रग्जचे व्यसन लागलेली दिसतात. पालकांचा मुलांबद्दलचा बेजबाबदार दृष्टिकोन किंवा मुलांवर आंधळा विश्वास, फॅशन आणि चित्रपट उद्योगाचा नकारात्मक परिणाम आणि सोशल मीडियाचे व्यसन यामुळे मुलांचा विकास चुकीच्या दिशेने होत आहे. जर आत्ताच मुलांच्या कोवळ्या मनावर ड्रग्जचे विष वर्चस्व गाजवू लागले, तर देशाचे उज्ज्वल भविष्य गुन्हेगारीच्या दलदलीत भरून जाईल. आजकाल तरुण प्रत्येक छोट्या गोष्टीवर पार्टी करतात आणि पार्टीच्या नावाखाली नशा करतात. आज आपण जिकडे पाहतो तिकडे ड्रग्जची तस्करी, व्यसनींकडून होणारे गुन्हे, अपघात आणि वाईट बातम्या आहेत, क्वचितच असा दिवस जातो जेव्हा नशे संबंधित बातम्या येत नाहीत. ड्रग्जचे जाळे वेगाने पसरले आहे, अगदी ड्रग्जच्या तस्करीत मुलांचाही वापर केला जात आहे.

देशात वापरल्या जाणाऱ्या सर्वात सामान्य अंमली पदार्थांमध्ये अल्कोहोल, निकोटीन, गांजा, चरस, भांग, हेरॉइन, फार्मास्युटिकल ओपिओइड्स, फेंटानिल, कोडीन, मेथॅम्फेटामाइन, कोकेन, बेंझोडायझेपाइन्स आणि अफू यांचा समावेश आहे. लहान मुले देखील नशा करण्यासाठी ग्लू, व्हाईटनर, कफ सिरप, वेदनाशामक, पेंट थिनर,



फिनाईल, सॅनिटायझर, पेट्रोल किंवा इतर ज्वलनशील उग्र वास असणारी रसायने श्वासाने घेण्याकरिता वापरतात. मुलांमध्ये दारू आणि तंबाखूचा वाढता वापर हा देखील चिंतेचा विषय आहे. आज, संघटित गुन्हेगारी अवैध ड्रग्ज व्यापाराला चालना देत आहे, ज्याचे जगभरातील लोक आणि समुदायांवर विनाशकारी परिणाम होत आहेत. म्हणूनच या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज गैरवापर विरोधी दिन २०२५ चे घोषवाक्य साखळ्या तोडणे: सर्वांसाठी प्रतिबंध, उपचार आणि पुनर्प्राप्ती! आहे. हे घोषवाक्य ड्रग्ज गैरवापर आणि बेकायदेशीर तस्करीचा सामना करण्यासाठी सामुदायिक पाठिंबा, आरोग्यसेवेची उपलब्धता आणि जागतिक एकतेची आवश्यकता यावर भर देते. आपण सर्वांनी आपल्या पातळीवर जागरूक होऊन ड्रग्ज व्यसनाच्या विरोधात लढले पाहिजे.

देशातील सर्वात शिक्षित राज्य असलेल्या केरळमध्ये पंजाबपेक्षा जास्त व्यसनी आहेत. हो, ही आकडेवारी भयावह आहे. २०२४ मध्ये, केरळमध्ये नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स कायद्यांतर्गत २७,७०१ प्रकरणे नोंदवली गेली, जी पंजाबमधील ९,०२५ प्रकरणांपेक्षा तिप्पट आहे. देशातील सर्व राज्यातून केरळमध्ये ड्रग्जशी संबंधित प्रकरणांचे प्रमाण सर्वाधिक आहे. गेल्या चार वर्षांत, केरळमध्ये ८७,१०१ ड्रग्जशी संबंधित प्रकरणे नोंदवली गेली, जे मागील वर्षाच्या तुलनेत १३० टक्के वाढ आहे. प्रत्येक जिल्हा प्रभावित आहे आणि या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत, ३० खून ड्रग्जच्या गैरवापराशी संबंधित होते, जे राज्यातील एकूण खूनांपैकी निम्मे आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतातील रस्त्यांवर ५० लाखांहून अधिक मुले अमानुष परिस्थितीत राहतात आणि काम करतात, जिथे त्यांना अंमली पदार्थांच्या गैरवापराचा धोका जास्त असतो. सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, देशात १० ते १७ वयोगटातील १.५८ कोटी मुले अंमली पदार्थांचे व्यसन करतात.

डब्लूएचओच्या मते, अल्कोहोलच्या हानिकारक वापरामुळे दरवर्षी ३.३ दशलक्ष मृत्यू होतात, तंबाखू उत्पादनांवर उत्पादन शुल्क म्हणून वसूल केलेल्या प्रत्येक १०० रुपयांमागे भारतीय अर्थव्यवस्थेला ८१६ रुपयांचे नुकसान होते, २०१७ ते २०१८ दरम्यान ३५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांसाठी तंबाखूच्या वापरामुळे होणारे सर्व आजार आणि मृत्यूंचे आर्थिक नुकसान २७.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स होते. २०११ ते २०५० दरम्यान, अल्कोहोलशी संबंधित मृत्यूंमुळे २५८ दशलक्ष आयुष्य वर्षे गमावली जातील. अंमली पदार्थांच्या वापराच्या विकाराने ग्रस्त असलेल्या ६४ दशलक्ष लोकांपैकी, ११ पैकी फक्त १ व्यक्तीला उपचार मिळतो. अंमली पदार्थांच्या वापराच्या विकाराने ग्रस्त असलेल्या १८ पैकी फक्त १ महिला उपचार घेते, तर ७ पैकी फक्त १ पुरुष उपचार घेतात. गृह मंत्रालयाने १८ मार्च २०२५ रोजी लोकसभेत सांगितले की, गेल्या पाच वर्षांत देशभरातील बंदरांमधून १९ प्रकरणांमध्ये एकूण ११,३११ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे ड्रग्ज जप्त करण्यात आले. सतत कारवाई करूनही, भारतात अंमली पदार्थांचे व्यसन वाढत आहे, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या मते, भारतात अंदाजे १०० दशलक्ष लोक विविध अंमली पदार्थांच्या व्यसनांनी ग्रस्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या औषध आणि मानसोपचार विषयक कार्यालय ने प्रकाशित केलेल्या जागतिक औषध अहवाल २०२४ नुसार, जागतिक अंमली पदार्थाचा वापर २९२ दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचला आहे, जो मागील दशकाच्या तुलनेत २० टक्के वाढ आहे.

२०१९ ते २०२१ दरम्यान उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि पंजाब सारख्या राज्यांमध्ये नार्कोटिक्स ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्स कायद्यांतर्गत सर्वाधिक एफआयआर नोंदविण्यात आले. २०१९ मध्ये सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने केलेल्या भारतातील अंमली वापराच्या प्रसार आणि पद्धतीवरील राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, १० ते ७५ वयोगटातील १६० दशलक्ष लोक सध्या दारूचे सेवन करत आहेत. यापैकी ५.२ टक्के लोक दारूवर अवलंबून आहेत. बनावट दारूमुळे देशात व्यसनी लोकांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होतो. मद्यपान हा एक जुनाट आजार आहे ज्यामुळे लोकांना दारूची इच्छा होते आणि ते त्यांचे मद्यपान नियंत्रित करू शकत नाहीत.

यसनींना त्वरित उपचार देण्याची आणि नवीन पिढीचे ड्रग्जकडे वाढणारे आकर्षण थांबवण्याची गरज आहे. यामध्ये सरकार, धर्मादाय संस्था आणि जनतेचे परस्पर सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी त्यांची जबाबदारी समजून घेतली पाहिजे, त्यांच्या निष्काळजीपणामुळे मुले भरकटू नयेत आणि समाज आणि देशासाठी समस्या बनू नयेत. पालकांचे मुलांवर नियंत्रण, सभोवतालचे पोषक वातावरण, जागरूकता आणि कुटुंबातील सदस्यांमधील चांगले समन्वय त्यांना व्यसनापासून मुक्त ठेवू शकते. पालकांनी मुलांचा हट्टीपणा, खोटा देखावा आणि गरज यातील फरक समजून घेतला पाहिजे. मुलांचे फक्त लाड पुरवणे किंवा पालकांनी व्यस्ततेच्या नावाखाली मुलांवरील नियंत्रण गमावू नका. मुलांच्या हालचालींकडे लक्ष द्या. मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून मुलांसोबत वेळ घालवा. त्यांना चांगल्या आणि वाईट गोष्टींबद्दल ज्ञान आणि प्रेरणादायी धडे द्या. त्यांना जबाबदाऱ्या आणि नातेसंबंधांचे मूल्यांकन करायला शिकवा. मुले मोठ्यांचे अनुकरण करतात, म्हणून मुलांसमोर अनुचित वर्तन टाळा. नशा करू नका किंवा आपल्या प्रियजनांना सुद्धा नशा करू देऊ नका. मुलांना सोशल मीडिया, ऑनलाइन गेम, उत्तेजक फॅशन आणि मोबाईलपासून दूर ठेवा. मुलांना त्यांच्या निरागसतेने आणि बालपणाने जगू द्या, त्यांना गॅजेट्स पासून दूर करून बाहेर फिटनेस, क्रीडा स्पर्धा, खेळ खेळण्यास प्रोत्साहित करा. मुलांच्या मोहात पालकांनी भावनांवर आधारित निर्णय घेऊ नयेत, तर मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करून धोरणे बनवावीत आणि मुलांना नैतिकता, परोपकार, सत्यता, मानवतेचे धडे शिकवा. अशी संस्कारशील मूल्ये असलेली मुले कधीही ड्रग्जचे व्यसन लावू शकत नाहीत आणि तरच देशाचे भविष्य ड्रग्जमुक्त होऊन सशक्त बनेल.

**– डॉ. प्रीतम भी. गेडाम**

पान १ वरून पुढे...

## करोडोच्या संख्येने...

समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे. घराघरातील मराठा समाज इथे प्रत्यक्ष येणार आहे. फेसबुक, सोशल मिडिया, व्हॉट्स ॲप यावर घरी बसून बघण्यापेक्षा आपण सगळ्यांनी उद्या १२ वाजता अंतरवालीत या. कारण आपल्याला प्रत्यक्ष चर्चा करायची आहे. आपली एकजूट दिसली पाहिजे. घरी बसून आपली एकजूट दिसत नाही. आपल्या लेकरा-बाळांच्या आयुष्याचा प्रश्न जर मार्गी लावायचा असेल, तर आपली सगळी कामे बाजूला ठेवून एकत्र यायला पाहिजे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील मराठ्यांनी यावे. इथे आल्यानंतर प्रत्यक्ष तुम्हाला सगळ्या गोष्टी सांगितल्या जातील. सगळ्या गोष्टी सोशल मिडिया आणि मीडियाच्या माध्यमातून सांगता येत नाही. खूप महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले. कोणत्या विषयावर ठराव करून, त्यावर ठाम निर्णय घ्यायचे आहेत, यावर बैठकीत चर्चा होणार आहे. समाज शेवटी एकजूट राहायला पाहिजे. समाजाला आपल्याला उंचीवर न्यायचे आहे. समाज खाली राहता कामा नये. त्यासाठी प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित राहून आपण आपली एकजूट दाखवायची आणि आपल्या सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करून घ्यायची. समाज मोठा करणे, लेकरं-बाळं मोठी करणे, हाच मुख्य या बैठकीचा अजेंडा आहे. आपली लेकरे खुर्चीवर बसली पाहिजेत, ते अधिकारी झाले पाहिजे, मराठा समाजावर होत असलेला अन्याय थांबला पाहिजे, मराठा समाजाच्या सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी नीट झाली पाहिजे, असे मनोज जरांगे यांनी सांगितले. दरम्यान, आता विजय मिळवायचा आहे. सगळेच आता सांगून योग्य होणार नाही. माझा आणि माझ्या समाजाचा काय उद्देश आहे, बैठकीचे मुख्य धोरण काय आहे. आपल्याला काय करायचे आहे आणि काय मिळवायचे आहे, हे उद्या सविस्तर मराठा समाजाला सांगणार आहे.

## विजय पवार...

होणाऱ्या बीड जिल्हा शैक्षणिक बंद मध्ये सर्व पक्ष संघटना यांनी वाद बाजूला सारून एकत्र येऊन न्यायासाठी लढा देण्याचे आवाहन डॉक्टर योगेश क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत केले आहे. नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी

पान १ वरून पुढे...

शिक्षक विजय पवारला राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात पवार यांचा दबदबा असून, याआड अनेक आर्थिक गैरव्यवहार झाले असल्याचा आरोपही डॉ.क्षीरसागर यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडितेला न्याय द्यावा. तसेच, सोमवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला असून सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.विजय पवार हा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो लोकप्रतिनिधीच्या घरी गेला आणि त्यानंतर फरार झाला, असे सांगत यंत्रणेवर दबाव टाकला गेला का, याची चौकशी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. शिक्षण क्षेत्रात पवारचा दबदबा असून, याआड आर्थिक गैरव्यवहार, जमीन घोटाळे व क्लासेस चालक व विद्यार्थ्यांना त्रास देण्याचे प्रकार घडले आहेत.

## खाजगी क्लासेस...

झाले. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि माफक फीस निश्चितीचे नियम केले पाहिजेत. विद्यार्थिनींना छळण्याचे प्रकार खाजगी कोचिंग क्लासेस सह इतर शाळांमध्ये सुद्धा घडतात. कोचिंग क्लासेस मधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या चारित्र्याची पडताळणी प्रशासनाने केली पाहिजे खाजगी कोचिंग क्लासेस मधील शिक्षकांची पूर्ण माहिती पोलीस यंत्रणेकडे असली पाहिजे. पोलिसांनी जिल्हा प्रशासनाने खरंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन खाजगी कोचिंग क्लासेस साठी कायदेशीर धोरण आखून सामान्य पालकांना दिलासा दिला पाहिजे.

## दीड वर्षापासून...

(मेहकरी) येथील रोजगार सेवक यांचे दीड वर्षांपूर्वी निधन झाल्यामुळे नवीन रोजगार सेवक नेमावा यासाठी २० डिसेंबर २०२४ ठराव क्रमांक ४ मासिक सभा कानडी खुर्द (मेहकरी) ता.आष्टी यांच्याकडून कळविण्यात आले की रोजगार सहाय्यक अर्ज दि २० जानेवारी २०२५ ते २५ जानेवारी २०२५ च्या दरम्यान नवीन रोजगार सेवक भरतीसाठी अर्ज मागविण्यात आले होते यामध्ये दोनच अर्ज आले होते या अर्जाची दखल घेण्यासाठी २६

पान १ वरून पुढे...

जानेवारीची ग्रामसभा रद्द करण्यात आली होती परंतु रोजगार सेवकाची नेमणूक करण्यात आली नाही पुढील तारीख २२ मार्च २०२५ ला ग्रामसभेचे नोटीस बजावली होती, परंतु ३ एप्रिल २०२५ रोजी ग्रामसभा घेण्याची ठरवले होते परंतु सरपंच, ग्रामसेवक यांनी २ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या पत्रानुसार ग्रामसभा रद्द करण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना ३ एप्रिल २०२५ रोजी अर्ज केला असता १७ एप्रिल २०२५ पत्राद्वारे गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवक व सरपंच यांना सात दिवसांच्या आत अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा व ग्रामसभा घेऊन रोजगार सेवक नियुक्त करण्याचे आदेश देऊन सुद्धा ग्रामसेवक व सरपंच यांनी कोणतेही प्रकारची कारवाई केलेली नाही, त्यामध्ये दोनच अर्जाची दखल घेण्यात यावी असे गटविकास अधिकारी यांना दिलेल्या अर्जात ग्रामस्थांनी मागणी केलेली आहे. नसता आंदोलन करण्याचा इशारा विष्णू जगताप,मन्सूर पठाण, आरिफ पठाण,सुदाम गायकवाड ,युनूस शेख,रावसाहेब बनसोडे, नामदेव शिंदे,उद्धव गव्हाणे,अनिल जगताप,बाळासाहेब जगताप यांनी दिला आहे.

## जगाला हिरव्या...

यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे बोलत होते. यावेळी लेखक अरविंद जगताप, सह्याद्री देवराई समन्वयक शिवराम घोडके यांची उपस्थिती होती. शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेल्या पालवनच्या डोंगरावर २०१६-१७ मध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे, अरविंद जगताप, शिवराम घोडके यांनी वन विभागाच्या २५० एकरमध्ये १ लाख ६४ हजार विविध जातीचे वृक्ष लावून ३ एकर मध्ये ३ घन वन तयार केलेले आहे. त्याच धर्तिवर बीड पासून ७ किलो मीटर अंतरावर असलेल्या रामगडावर १० एकर मध्ये देवराई २ होणार आहे. येथे विविध सुगंधी, पक्षी बसणारे, औषधी, फळ, सावली देणारे १० हजार वृक्ष लावण्यात येणार आहेत. तर ४० गुंठ्यामध्ये २ घन वन प्रकल्पाचे काम १५ रोजी मे पासून सुरू झाले आहे. आतापर्यंत येथे ५ हजार खड्डे जेसीबीच्या सहायाने खोदण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी अभिनेते सयाजी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेवून माध्यमांशी संवाद साधला. श्री क्षेत्र रामगड येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, डॉ. प्रदीप

पान १ वरून पुढे...

शेळके, सुहास वायंगणकर, सागर साठे,माजी सरपंच कोंडीराम निकम, शरद निकम हे उपस्थिती होते.लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांची लागवड: श्री क्षेत्र रामगड येथे होणाऱ्या देवराई प्रकल्पाची सुरूवात लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त येथे वेगवेगळ्या जातीचे ७५ झाडे लावून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली.

## विजय पवार...

रूम मधून व्हावे. तसेच प्रत्येक क्लासेस मध्ये तक्रार पेटी ठेवून भागणार नाही तर तक्रार निवारण कक्ष उभारण्यात यावा. याचेही नियंत्रण आपल्या कक्षा मार्फत व्हावे. त्यामुळे अशा वासनानांध प्रवृत्तीला आळा बसेल. अशा गून्हेगारास तात्काळ अटक करून त्यांना शिक्षा करावी. असे निवेदन देण्यात आले. या वेळी बीड शहाराध्यक्ष अशोक लोढा, केशव बडे , सतीश कोटेचा, अमोल वडविले सह भाजपाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील गुटखा...

कारवाई दिनांक २८/०६/२०२५ रोजी वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनि वर्षा व्हगाडे यांना गोपनीय माहीती मिळाली होती की, वडवणी पोलीस स्टेशन हद्दीतील कुंदेवाडी गावातील इसम नामे संतोष बाबासाहेब कोठुळे हा त्याचे राहते घरात रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटख्याचा साठा करुन ठेवलेला आहे. त्यावरुन सपोनि वर्षा व्हगाडे यांनी पोअं/१८०९ विलास खरात, ९४९ बिभीषण मुंजाळ, १७४ नवनाथ लटपटे, १९७० किरण इरमले, २०१९ वसंत करे अशा पोलीस स्टाफसह खात्रीशीर गोपनीय माहितीच्या आधारे संतोष कोठुळे याचे राहते घरी कुंदेवाडी ता. वडवणी येथे छापा टाकला असता त्याचेकडे पाच्या राहत्या घरातून एकूण ₹३,७२,२००/- किंमतीचा विविध प्रकारचा गुटखा माल मिळून आला आहे. सदर प्रकरणात आरोपी संतोष बाबासाहेब कोठुळे रा. कुंदेवाडी ता. वडवणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच तिसऱ्या कारवाईत दिनांक २७/०६/२०२५ रोजी रात्री ११:५५ वा. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बालक कोळी यांना गोपनीय बातमीदारा मार्फत खात्रीलायक माहिती मिळाली.

पान ४ वरून पुढे...

## खासगी आस्थापनांनी...

आस्थापनांची नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे, असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद आहे. समिती नोंदविण्याची कार्यपद्धती - अंतर्गत तक्रार समिती नोंदविण्यासाठी https://shebox.wcd.gov.in या संकेतस्थळावर जाऊन होम स्क्रीनवर दाखविल्याप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती नोंदवा (Private Head office Registration) या टॅबवर उश्रळलज्ञ करा. आवश्यक त्या सर्व माहितीचा तपशील भरून र्डीलाळीं या ढरल वर उश्रळलज्ञ करून अंतर्गत तक्रार समितीची माहिती नोंदवा.

## बिभीषण शेंडगे...

कार्यक्रमाला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संयज राऊत, डॉ.विवेक पालवनकर, डॉ.संकेत बाहेती, डॉ.विवेक दुसाने, डॉ.सुधीर जाधव, डॉ. जयश्री बांगर, डॉ.शितल पानसंबळ, डॉ.ऋषिकेश पानसंबळ, डॉ.निखिल जोशी, डॉ.विशाल कोटेचा, डॉ.संदिप सालवे, डॉ.सारिका बाहेती, डॉ.हनुमंत पारखे, डॉ. बाबासाहेब शेंडगे, अशोक ठाकरे, बळीराम गवते, गणेश वरेकर, धनंजय शेंडगे, संतोष जाधव, राहुल वायकर, मुकुंद गोरे, इंन्फंड इंडियाचे बारगजे, मेघराज कोल्हे, हरि गोरे, अशोक तांबारे, नागेश तांबारे, शुभम मुंजाळ, रितेश साबळे, बाबु ढेरे, नवनाथ गवते, विठ्ठल काळे, अमोल आबुज आदी प्रमुख अतिथींचे रक्तदान शिबीराला उपस्थिती होती. नेहमी जनसेवेत राहून सर्वसामान्यांचे काम करणारे बिभीषण शेंडगे यांनी वाढदिवसानिमित्त अनावश्य खर्च टाळून शहरातील अनेक सामाजिक संस्थांना भेटीगाठी देत विविध साहित्य देण्याचे काम केले तसेच अनेक ठिकाणी अन्नदान करण्यात आले. जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील निराधार नागरिकांना कोटी तसेच मोठे आंब्याचे झाड दिले. या अशा विविध सामाजिक उपक्रमातून बीभीषण शेंडगे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला आहे.

पान ४ वरून पुढे...

## पाटोदा नगरीत...

साथ सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पाटोदा नगरपंचायत, पोलीस प्रशासन, वैद्यकीय सेवा, स्वयंसेवक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे अतुलनीय कार्य केले. वाहतूक, स्वच्छता, पाणीपुरवठा, अन्नछत्र, महाप्रसाद आदी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे पार पाडण्यात आल्या. कोणतीही अडचण न येऊ देता संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडला.पाटोदा नगरीचा सुवर्णक्षण संत भगवान बाबा यांच्या पालखीचे पाटोदा नगरीतील आगमन हा केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो संपूर्ण शहरासाठी एक आध्यात्मिक महोत्सव होता. हा दिवस नगरीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. संतांचे पावन चरण स्पर्शल्याने संपूर्ण पाटोदा अध्यात्मिक उर्जेने भारावले होते.

## दासखेडच्या आरोग्य...

पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्यामुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून संन पावर प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पर्यावरण सप्ताह वन बीज वनस्पती फुले लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे त्यात हवा पाणी जमीन जंगल आणि सर्व सजीवांचा समावेश आहे. असे प्राणी पक्षी नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करून आपल्या उपयोगिता कशा वाढवू शकतो. वन बीज बियाण्यांचे महत्त्व यावेळी नागरिकांना पटवून देण्यात आले. जसे की, बिबा हे एक औषधी असून याचा उपयोग गंभीर आजारासाठी होतो.या वेळी.उपस्थित. डॉ शरयू पडोळे. डॉ.युवराज राठोड.सय्यद कादर . महोन गाडे सन पावर

पान ४ वरून पुढे...

प्रायव्हेट लिमिटेड . डॉ हरिदास शेलार.नितेश कुमार राख. गणेश मस्के. राहुल चव्हाण. शेख मिनाज ताई .गणेश बामदळे.लखन पवार.गणेश सरडे. अश्विनी सोनवणे.शुभम राख. तसेच सामाजिक कार्यकर्ते अशोक कोकाटे. दत्ता कोकाटे. किरण कोकाटे. बाबु पवळ हे उपस्थित होते.

## कृषिदुतांनी अंथरवन...

शेतकऱ्यांना पटवून दिली. पावसाळा हा ऋतू शेती व पशुपालन व्यवसायाकरिता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो त्यामुळे पावसाळ्यामध्ये पशूंची शास्त्रयुक्त संगोपन करणे गरजेचे असते. असंतुलित आहार, प्रतिकूल वातावरणात आवश्यक निवारा न दिल्याने तसेच कीटकापासून संरक्षण न केल्यास जनावर विविध संसर्गजन्य आजारांना बळी पडू शकतात असे याप्रसंगी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी गावातील प्रगतशील शेतकरी व ग्रामस्थांनी उपस्थित राहून उत्तम प्रतिसाद दिला. या प्रात्यक्षिकासाठी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे विषयतज्ञ डॉ. धनंजय सातपुते यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या उपक्रमाकरिता विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीची सारडा मॅडम, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्ग त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## यशस्वी होण्यासाठी...

मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ ज्योतीताई ठाकुर (उपाध्यक्षा- भा. शि. प्र. संस्था, अंबाजोगाई), तसेच नवभारत एज्युकेशन पुरस्कार प्राप्त प्रा. चंद्रकांत मुळे (मुख्य प्रशासकीय समन्वयक- भा. शि. प्र. संस्था, अंबाजोगाई), तसेच व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक

पान ४ वरून पुढे...

संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना प्रा चंद्रकांत मुळे यांनी सांगितले की, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही गुणवत्तेची खाण आहे ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे आहेत. मला मिळालेल्या पुरस्काराचे सर्व श्रेय भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे आहे असे त्यांनी सांगितले व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन भावी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे या बोधवाक्याच्या प्रेरणेतून या संस्थेची वाटचाल सुरू झाली. या संस्थेच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. गुणवत्ता, संस्कार आणि भौतिक दृष्टीने सर्वात मोठे संकुल श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल आहे. .

## लिंबागणेश येथे...

आली.तसेच अग्रो स्टार फेरफार अदालत, जिवंत सातबारा मोहीम, नकाशावरील रस्ते खुले करणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. मंडळ अधिकारी जायभाये आणि तलाठी गणपत पोतदार यांनी कामकाज पाहून कार्यक्रम यशस्वी केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, जीवन मुळे,अँड.गणेश वाणी, संतोष भोसले,शेख अझीम, संतोष वाणी,भालचंद्र वायभट,सुंदरराव येडे,जितु निर्मळ,केशव गिरे, वैजनाथ भोसले आणि डॉ.गणेश ढवळे व पत्रकार हरीओम क्षीरसागर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शेतकरी महिला बहुसंख्येने लाभार्थी उपस्थित होते.यावेळी डीबीटीचे काम मोठ्या प्रमाणात झाल्याबद्दल लाभार्थ्यांनी व गावकऱ्यांनी महसूल प्रशासनाचे आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याप्रती प्रामाणिकपणामुळे संस्था नावारूपाला आली : रणवीर पंडित

**● पवार शिक्षक यांचा सेवापुर्ती समारंभ**



**तलवाडा । प्रतिनिधी**

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथील शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची मेहनत, कर्तव्यप्रती प्रामाणिकपणा यामुळे संस्था नावारूपाला आली. संस्थेअंतर्गत घेतलेल्या क्रीडा महोत्सवात क्रीडा शिक्षकांनी उत्कृष्ट काम केल्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडू घडू शकले. क्रीडा शिक्षक धनासिंग किसनराव पवार सरांनी देखील आपल्या कार्यकाळात मैदानाशी नाते जोडले आणि त्यामुळे या भागातील मुलांना क्रीडा क्षेत्रात नाव कमविण्यासाठी संधी मिळाली. संस्थेच्या वेगळ्या वेगवेगळ्या कामात पुढाकार घेतला. या सर्व कर्मचाऱ्यांचे

संस्थेसोबतच शिवछत्र परिवारासी घनिष्ठ नाते आहे, त्यांच्या ऋणात आम्ही कायम आहोत असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अर्कॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. माध्यमिक व उच्च माध्यमिक तलवाडा विद्यालयाचे क्रिडा शिक्षक धनासिग पवार यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. तलवाडा येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक धनासिंग पवार हे आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. शनिवार दिं.२८ जुन रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती शारदा स्पोर्ट्स अर्कॅडमीचे अध्यक्ष रणवीर काका पंडित, प्रमुख अतिथी जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, लेखा अधिकारी प्रताप हाटोटे,स.प्र. काशिनाथ गुगले,मुख्याध्यापक अशोक तौर, डॉ आसाराम मराठे, माजी मुख्याध्यापक पटेल, यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षक धनासिंग पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना धनसिंग पवार म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यामुळे आमच्या जीवनाचे चीज झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अध्यापना सोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम केले. कर्मचाऱ्यांना आपलेसे करणारा शिवछत्र परिवार कायम आमच्या पाठीशी आहे. यापुढील काळातही शिवछत्र परिवाराशी आम्ही कायम एकनिष्ठ राहू असे भावनिक मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी माजी सरपंच मिना विष्णू हात्ते, मुख्याध्यापक अरूण हाटकर, मुख्याध्यापक पंडित, उपसरपंच आक्रम सौदागर, नजीर कुरेशी, मुबीन खतीब, माऊली डोंगरे, पत्रकार बापुगाडेकर, पत्रकार आल्ताफ कुरेशी, सुरेश गांधले, विष्णू राठोड, आर आर बहिर, गणेश महाराज कचरे, खदीर तांबोळी, महेश मरकड,मुजमिल शहा, लाला शेख,मरकड सर, दत्ता वाघमारे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लाड सर, यांनी केले तर प्रस्ताविक पाठक सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार जाधव यांनी मानले कार्यक्रमाला सर्व मुख्याध्यापक ,शिक्षक वृंद ,शिक्षिका व कर्मचारी व पवार कुटुंब मोठ्या संख्येने होते.

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज लोक कल्याणकारी राजे होते - जिल्हा क्रीडा अधिकारी- अरविंद विद्यागर



**बीड । प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज लोककल्याणकारी राजे होते. बहुजनांना शिक्षण, जातिभेद निमूलन, नोकर्यांमध्ये आरक्षण आणि स्त्रीमुक्तीसाठी कायदे करणारे सुधारणावादी समाजसुधारक होते. असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले.

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथ./ माध्य विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज जयंती व दहावी गुणवंत विद्यार्थीनींचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिकारी मा.अरविंद विद्यागर हे होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष बीड जिल्हा हॉकी संघ- दिनकर थोरात, अध्यक्ष टायगर ग्रुप बीड- राकेश जाधव, संस्थेचे अध्यक्ष इंजि.बलभिमराव जाहेर पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.बी आर.पंडीत, सचिव प्रा.जे. पी. शेळके,संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. ए.आर.पाटील,सहसचिव प्रा.व्ही.एल.जोगदंड,संचालक ऋषिकेश शेळके, संचालक विश्वनाथराव माणूसमारे, संचालक प्रा. ए.आर.डंबरे, ऋषिकेश पाटील, मु.अ.एस.डी. कदम, मु.अ.आर.टी.राऊत, सिराज भाई यांची उपस्थिती होती.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात करिअर कट्टा संसद स्थापन



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात करिअर कट्टा संसद उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. ढास डि.के. उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. मातकर व्ही. बी., डॉ. मकबूल सलीम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करिअर कट्टा समन्वयक डॉ. जाधव जे.के. यांनी केले. त्यांनी आपला प्रस्ताविकेत करिअर कट्टाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. मातकर व्ही .बी.बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपली ध्येय कॉलेज जीवनातच ठरवावे व आपल्या भावी जीवनात आपल्याला काय करायचे आहे याकडे वाटचाल केली पाहिजे. शासनाच्या करियर कट्टा यासारख्या उपक्रमात आपण सक्रिय सहभाग नोंदवावा आणि राजकारण मोबाईल यापासून दूर राहून एमपीएससी यूपीएससी यासारख्या अभ्यासक्रमाकडे लक्ष द्यावे जेणेकरून भविष्यात आपल्यावर बेरोजगार राहण्याची वेळ येणार नाही. कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

# 'प्रामाणिकपणा यशाचा पाया; बालपणाचा आनंद घ्या, ताण न घेता अभ्यास करा'

## पोलीस पाल्यांसाठी मार्गदर्शन शिबीर - पोलिस अधीक्षक नवनीत काँवत व त्यांच्या पत्नी नितिका विलाश - काँवत यांनी केले मार्गदर्शन



**बीड । प्रतिनिधी**

पोलीस मुख्यालयात २८ जून रोजी आयोजित एका विशेष कार्यक्रमात बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (IPS) आणि त्यांच्या पत्नी नितिका विलाश-काँवत (IRS) यांनी पोलीस पाल्यांना करिअर आणि जीवनाविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले. या शिबिराला जिल्ह्यातील २०० हून अधिक पोलीस पाल्य आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नितिका काँवत यांच्या भाषणाने झाली. त्यांनी करिअर निवडीच्या वेळी कोणता दृष्टिकोन ठेवावा, यावर मार्गदर्शन केले. कोणतेही करिअर क्षेत्र निवडताना त्यातून मिळणारे आत्मिक समाधान सर्वात महत्त्वाचे असते, असे त्यांनी सांगितले. काम करताना केवळ आर्थिक यश नव्हे, तर मनाला आनंद मिळणे आवश्यक आहे, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले, तुम्ही शालेय जीवनात असाल किंवा आयुष्यातील कोणत्याही टप्प्यावर, प्रामाणिकपणा हा तुमच्या यशाचा पाया आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनाचा पुरेपूर आनंद घेण्याचे महत्त्व पटवून दिले. बालपण आयुष्यात एकदाच येते आणि त्यानंतर जबाबदाऱ्या आयुष्यभर सोबतीला असतात, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचा अनावश्यक ताण न घेण्याचा सल्ला दिला. बालपणाचा आनंद घेतानाच गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे, जेणेकरून आपले शैक्षणिक जीवन आणि बालपण दोन्ही वाया जाणार नाही, यावर त्यांनी भर दिला. मार्गदर्शन सत्रानंतर विद्यार्थ्यांनी करिअर, स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासाच्या पद्धतींबद्दल अनेक प्रश्न विचारले. काँवत आणि त्यांच्या पत्नी नितिका काँवत यांनी त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले.

**● पोलीस मुख्यालयात सुसज्ज ग्रंथालय अन् अभ्यासिका उभारणार– या कार्यक्रमात पोलीस पाल्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला. पोलीस अधीक्षक काँवत यांनी सांगितले की, लवकरच पोलीस पाल्यांसाठी पोलीस मुख्यालयात एक सुसज्ज ग्रंथालय आणि अभ्यासिका उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, विविध विषयांवरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र वेळोवेळी आयोजित करण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या निर्णयाचे उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले, कारण यामुळे पोलीस पाल्यांना त्यांच्या स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या तयारीसाठी मोठी मदत मिळणार आहे.**

## माजी खा. समीरभाऊ भुजबळ यांच्या उपस्थितीत आज समता परिषदेची आढावा बैठक



**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीरभाऊ भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि. २९ जून रोजी समता परिषदेच्या बीड, लातूर, धाराशिव या तीन जिल्ह्यांची आढावा बैठक बीड येथे आयोजित करण्यात आली असून या बैठकीस जिल्हा पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, तालुका कार्यकारणी आणि समता सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे दुपारी २ : ३० वाजता सदरील बैठक संपन्न होणार आहे. यावेळी माजी खासदार तथा समता परिषदेचे कार्याध्यक्ष समीरभाऊ भुजबळ हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भात मार्गदर्शन करणारा असून त्याअनुषंगाने बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्याचा आढावा घेणार आहेत. तरी या बैठकीस तिनही जिल्ह्यातील जिल्हा पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, तालुका कार्यकारणी पदाधिकारी , व समता सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

## पथदिव्यांची लाईट नसल्यामुळे 'फुले दांपत्याच्या' फोटोवर पडला अंधार!

**... नसता क्रांतीची मशाल पेटवत आंदोलन करु -अश्विन जवंजाळ**



**गेवराई । प्रतिनिधी**

नगर शहरातील महात्मा फुले सिटी सेंटर येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेवर प्रकाश पडणारा पथदिवा गेल्या काही दिवसांपासून बंद आहे त्यामुळे अंधार झाला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप याकडे गेवराई नगरपरिषद कार्यालयातील विद्युत विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सावता परिषदेचे शहराध्यक्ष अश्विन जंवजाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे. सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे पाहायला मिळाले याबाबत विद्युत विभागाला वारंवार तोंडीं व लेखी तक्रार करत पथदिवे बसवण्यासाठी नेहमीच मागणी करत आलों. तरीही अधिकारी या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी या फुले दाम्पत्यांच्या प्रतिमेजवळ क्रांतीची मशाल पेटवत आंदोलन करण्यात येईल असाच इशारा शहराध्यक्ष अश्विन जवंजाळ यांनी दिला आहे.

# अंतरवाली येथे बैठकीसाठी जाणाऱ्या मराठा बंधवासाठी आनंद काळे यांच्या वतीने खिचडी वाटपाचे आयोजन

## जरांगे पाटलाच्या प्रत्येकआंदोलनासाठी खिचडी, पाणी , गाड्याची केली होती व्यवस्था

**वडवणी । प्रतिनिधी**



अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणसाठी संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील यांनी निर्णय बैठकीचे आयोजन दि.२९/६/२०२५ रोजी रविवारी या दिवशी आंतरवाली सराटी होते आयोजन करण्यात आले आहे या बैठकीला जाण्यासाठी केव्हा गावातून मराठा बांधव जाणार आहे त्यांच्या सकाळी नाश्त्याची व पाण्याची व्यवस्था ओबीसी समाजाचे युवा नेते मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात समाज कार्य करणारे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे खिचडी व पाणी वाटपाचे आयोजन करण्यात आले होते तरी महा बैठकीसाठी जाणाऱ्या सर्व मराठा बांधवाने नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन आनंद भैय्या काळे यांनी केले आहे.

मराठा समाजाला सरसकट ओबीसीतील आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन वर्षापासून संघर्ष होता म्हणून तरंगे पाटील हे वेळोवेळी आंदोलन करत आहेत मात्र शासनाने त्याची दखल न घेतल्यामुळे २९ ऑगस्टला मुंबई आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे त्यामुळे मोर्चाचे नियोजन करण्यासाठी दिनांक २९ जून रोजी अंतरवाली सराटी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे या बैठकीसाठी संबंध वडवणी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा युवक जाणार आहे त्यांना सकाळी ८ ते १२ या वेळेत खिचडीचा नाश्ता व पाणी वाटप चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी या मार्गाने येणाऱ्या सर्व मराठा बांधवांनी नाश्ता करूनच जावे असे आभार मराठा समाज बांधवांना केली आहे

मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात सिंहाचा वाटा उचलणारे ओबीसी चे नेते आनंद काळे यांनी या अगोदरही खिचडी वाटप पाणी वाटप गाड्यांची व्यवस्था यासह अनेक समाज कार्य केले आहे त्याचाच भाग म्हणून या आंदोलनातही ते मागे राहिले नाही त्यांनी या अगोदरही आंतरवाली सराटी येथे जाऊन जरंगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनात सहभाग नोंदवला त्यांच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तब्येतीची विचारपूस करणे, बीडला आल्यावर सत्काराचे आयोजन करणे एक प्रकारे जरांगे पाटलावर आनंद काळे यांचे नितांत प्रेम करणारा हा माणूस आहे कुठलाही जातीभेद न करता सर्व समाजाचे आपण देणे लागतो या भावनेने त्यांनी उद्याच्या बैठकीला जाणाऱ्या मराठा बांधवाची गैरसोय होऊ नये म्हणून खिचडी पाणी वाटप करण्याचे आयोजित केले आनंद भैय्या काळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी मराठा समाज बांधवांनी नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन केले आहे.

## खासगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रारी समितीची स्थापना करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई व निवारण) अधिनियम २०१३ ची प्रभावी अंमलबजावणी सर्व खासगी आस्थापनांनी करावी. त्याचबरोबर अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी विहित कार्यपद्धतीनुसार करण्याचे आवाहन जिल्हा व महिला बालविकास अधिकारी एफ.एम. शेख यांनी केले आहे. खासगी कार्यालयामध्ये दहा किंवा दहापेक्षा जास्त कर्मचारी असतील, अशा सर्व आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी SHE BOX PORTL वर करण्यासाठी केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. सर्व खासगी आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार समिती गठीत करावी व SHE BOX PORTL वर सर्व खासगी ▶▶ उर्वरित पान २ वर

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षांकडून कामकाजाचा आढावा

**महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली नियोजित उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी**



**बीड । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी आज बीडच्या जालना रोड येथे होत असलेल्या महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी केली. यासह याठिकाणी महामंडळाच्या काम काजाचा सविस्तर आढावाही घेतला.मराठवाड्यातील म हामंडळाचे सर्व जिल्हा समन्वयक, संबंधित कर्मचारी उपस्थित होते. मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.

# बिभीषण शेंडगे पाटील यांची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद- सीएस राऊत

**८० जणांनी केले रक्तदान ; शालेय साहित्याचेही वाटप, जनहिताचे उपक्रम**

**बीड । प्रतिनिधी**

गोरगरिबांच्या सेवेसाठी कायम तत्पर राहून नागरिकांच्या अडी अडचणी सोडवत अनेकांच्या मदतीला धावून जाणारे जनसेवक बिभीषण शेंडगे यांच्या अभिष्टचिंतन विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी बीड शहरालगत असलेल्या विविध सामाजिक संस्थांना अनेक साहित्य दान करण्याचे काम केले. त्याचबरोबर बीड जिल्हा लॅब संघटनेच्या वतीने रक्तदान शिबीर संजीवणी हॉस्पीटल येथे घेण्यात आले होते. या शिबीरात ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी मत व्यक्त करतांना जिल्हा शल्यचिकित्स डॉ.संजय राऊत यांनी म्हटले की, बीभीषण शेंडगे पाटील यांनी घेतलेले सामाजिक उपक्रम कौतुकास्पद आहेत. तसेच डॉ.पालवनकर यांनी म्हटले की, बीभीषण



प्रमाणेच इतरांनी सामाजिक बांधिलकी जपून अनावश्यक खर्च टाळत अनाथांच्या मदतीला देत अभिष्टचिंतन साजरा करावा असे मत व्यक्त केले. यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप

अनाथ व निराधान पालकांसाठी काम करणार्या ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्पातील तसेच बीड शहरातील मदर तेरेसा बालआश्रमातील मुलांना शालेय साहित्य वाटप करत अन्नदान करण्याचे काम त्यांनी केले.

### ● इंन्फड इंडियाला फ्रीज भेट

बीड शहराजवळ असलेल्या पाली येथील डोंगरावर वसलेल्या इंन्फड इंडिया एचआव्ही ग्रस्त बांधीत बालकांसाठी काम करणार्या संस्थेला अनेक साहित्य व मेडिशिन ठेवण्यासाठी फ्रिज नसल्याने अनेक महागडे औषध खराब होत असल्याची खंत व्यक्त केल्यानंतर बीभीषण शेंडगेंनी तात्काळ फ्रिज देण्याचे काम केले.

## पाटोदा नगरीत राष्ट्रसंत ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखी सोहळ्याचे भव्य स्वागत!

**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत, ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखीचे पवित्र आगमन होताच संपूर्ण शहर भक्तिरसात न्हालं. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदुंगांचा निनाद, आणि भक्तांच्या गजरांनी आसमंत दुमदुमून गेला. सर्वत्र श्रद्धा, आनंद आणि अध्यात्मिक उर्जा भरून राहिली होती.जसे की संतांचे स्वागत नव्हे, तर भक्तीचा महोत्सव!पाटोदा शहरात सकाळ पासूनच उत्सवाचे वातावरण होते. सकाळी १०.३० वाजता पालखीने



नगरात प्रवेश केला. हजारो भाविक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून 'जय संत भगवान बाबा' च्या घोषणांनी स्वागत करत होते. शहरातील गल्लीबोळ भगव्या पताकांनी, पुष्पसजावट आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजले होते. महिलांनी औक्षण करून, फुलांची अर्घ्ये वाहून, पारंपरिक पोशाखात भक्ती भावाने स्वागत केले. तर युवकांनी ढोल-ताशांच्या लयीत नृत्य करत भक्तीचा उत्सव उभारला.आस्थेने साकारलेले नियोजन, सेवाभावी हातांची ▶▶ उर्वरित पान २ वर

## दासखेडच्या आरोग्य केंद्रात डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून वृक्षलागवड

**सन पावर प्रायव्हेट लिमिटेड यांचा उपक्रम ; पर्यावरण संरक्षण सप्ताह उत्साहात**

**पाटोदा । प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षण सप्ताह उत्साहात मान्यवरांची उपस्थिती पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे संन पावर प्रायव्हेट लिमिटेड दि. २५ जून रोजी फळ झाडें व फुले लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीची वतीने झाडं लागवड करण्यात आली. यावेळी प्रकल्प समन्वयक मोहन गाडे म र्गदर्शन केले. वन हक्क प्राप्त गावात शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण



सुरक्षा प्रकल्प राबवला जात आहे. निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान आयुष्यात १०० झाडे लावायला ▶▶ उर्वरित पान २ वर

## कृषिदुतांनी अंथरवन पिंपरी गावात राबवली पशु लसीकरण मोहीम

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत ,सुनील मदने, बाबासाहेब पल्हाल, सचिन धुमाळ, गणेश ढोले, दयानंद सिरसट, योगेश मोरे, रेहान सय्यद, संदीप करडकर, श्रीदीप वलेकर, धीरज पवार, चैतन्य पाटील यांनी



ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषी संलग्नता उपक्रम २०२५-२६ अंतर्गत अंथरवन पिंपरी गावात पशु लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमे अंतर्गत पशुवैद्यकीय डॉ. योगेश शिंदे, यांच्या मदतीने जनावरांना लम्पी आणि खुरकूत रोगासाठी लसीकरण करण्यात आले. तसेच जनावरांना पावसाळ्यात होणारी आजारे व घ्यावयाची काळजी, गोठ्यातील स्वच्छता, खेळती हवा, स्वच्छ पाण्याचे व्यवस्थापन, लसीकरणाचे महत्त्व व अस्वच्छतेमुळे उद्भवणारे रोग व होणाऱ्या दुष्परिणाम याबाबत माहिती ▶▶ उर्वरित पान २ वर

## यशस्वी होण्यासाठी जे जे गुण हवेत ते गुण म्हणजे खरी गुणवत्ता : सुशील कुलकर्णी

**● संस्था वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न**

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७४ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याप्रसंगी सुशील कुलकर्णी बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेतील गुणांचा विचार न करता जीवनात



यशस्वी होण्यासाठी जे जे गुण, कौशल्य आवश्यक आहेत ते गुण व कौशल्य आत्मसात करणे म्हणजे खरी गुणवत्ता आहे. शिक्षणात अपयश मिळाले म्हणून खचून न जाता जिद्द आणि आत्म विश्वास यांच्या बळावर आपल्या आवडत्या क्षेत्रात आपण सर्वो च्च शिखरावर पोहचू शकतो याचे अनेक दाखले यावेळी त्यांनी दिले.

सकाळी ठिक साडे आठ वाजता सुशील कुलकर्णी यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर शहरातील मॉ वैष्णवी मंगल कार्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सीबीएसई, प्राथमिक, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा ▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश येथे महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत महाराजस्व समाधान शिबिर जिल्हाधिकारी विवेक जान्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. २८ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आयोजन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार आण्णासाहेब वंजारे, मंडळ अधिकारी महादेव जायभाये,ग्राम महसूल अधिकारी तलाठी लिंबागणेश गणपत पोतदार, तलाठी नारायण दराडे अंजनवती, तलाठी शेख गफुर लोणीघाट,तलाठी विपुल बनकर बेलखंडी पाटोदा,तलाठी अक्षय शिंदे बोरखेड,पुरवठा निरीक्षक श्रीराम वायभट,पुरवठा निरीक्षक संतोष मुळीक महसूल सेवक ललित काकडे आदींची उपस्थिती होती.

तहसील कार्यालयातील महसूल विभागाच्या संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, रेशनकार्ड, अपंग नोंदणी,वारस नोंदी, विवाह नोंदणी,जाती प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र,जातीचे दाखले वाटप, आधार लिंक,आदि विविध सेवा पुरविण्यात आल्या.ज्या अनुदान डीबीटी यावेळी बंद पडले होते अशा लाभार्थ्यांची डीबीटी कामे पूर्ण करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

